जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ


9 APR 2016

# राष्ट्राच्या जडणघडणीत अभियंत्यांचा वाटा

## डॉ. व्ही. के. रैना : शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभागातर्फे कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : राष्ट्राच्या जडणघडणीत अभियंत्यांचा मोलाचा वाटा असून आजचे विद्यार्थी उद्याचा भारत घडवतील, असे प्रतिपादन प्रख्यात अभियंते डॉ. व्ही. के. रैना यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात 'ब्रिज इंजिनिअरिंग : रिपेअर अँड रेट्रोफिटिंग ऑफ ब्रिजेस इन नेपाल अर्थक्वेक' या विषयावर ते बोलत होते. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या टेक्विप कक्षाने हा कार्यक्रम घेतला. बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते.



डॉ. रैना यांनी २०१५ मध्ये नेपाळमध्ये झालेल्या विनाशकारी भूकंपातील जीवित व वित्तहानीची पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून माहिती दिली. ते म्हणाले, "बांधकाम सक्षम करण्याची जबाबदारी उत्तम अभियंता जितक्या नेटक्या पद्धतीने पार पाडतो, तितक्याच उत्तम प्रकारे आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा आखण्याची जबाबदारीही तो स्वीकारतो. नेपाळच्या भूकंपामध्ये याची प्रचीती मोठ्या प्रमाणावर आली. वाळू माफियांकडून पुरविण्यात आलेल्या दर्जाहीन वाळू, सिमेंटच्या सहाय्याने उभारण्यात आलेली मोठमोठी बांधकामे क्षणात जमीनदोस्त झाल्याचे दिसून आले. नेपाळसह चीन, भारत, बांगलादेश यांनी बांधकामांच्या आपत्ती व्यवस्थापनविषयक आराखड्याची अधिक दक्षता घेतल्याचे दिसते."



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागातर्फे मुख्य सभागृहात बुधवारी डॉ. वीरेंद्र रैना यांचे व्याख्यान झाले. शेजारी डावीकडून डॉ. ए. के. साहू, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. एम. ए. काकडे, विकास पाटील, डॉ. यशवंत कोळेकर.

जगभरातल्या दर्जेदार आणि दर्जाहीन बांधकामांचा अनेक उदाहरणांसह त्यांनी आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी दोन्ही बाजू समजून घेऊन अधिकाधिक चांगली गुणवत्तेची कामगिरी आपल्या हातून होईल, यासाठी सदैव प्रयत्न करावेत, असे आवाहन डॉ. रैना यांनी केले.

जगभरातील पूल बांधणीच्या क्षेत्रातील वाटचालीचा व प्रगतीचा त्यांनी या वेळी तपशीलवार आढावा घेतला. या वेळी त्यांनी नेपाळमधील शिवगंगा, राप्ती व इलाई आदी क्षतिग्रस्त पुलांच्या पुनर्बांधणीच्या कामामधील तांत्रिक बाजूंची अभ्यासपूर्ण माहिती दिली.

बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी डॉ. रैना यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यार्थी यांना निश्चितपणे फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला.

तंत्रज्ञान अधिविभागाचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. साहू यांनी प्रास्ताविक केले. या वेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे, दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. नितीन सोनजे, पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. यशवंत कोळेकर, प्रशासकीय मंडळाचे सदस्य विकास पाटील, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, तसेच प्राध्यापक उपस्थित होते. सिव्हिल इंजिनिअरिंग समन्वयक महेश साळुंखे, टेक्विप समन्वयक श्रीकांत भोसले, महेश काकडे, व्ही. के. कांबळे, बी. बी. पाटील, पूनम फडणीस, नीलेश सुतार, इंडस्ट्री सेलचे समन्वयक हर्षवर्धन पंडित, अमोल कुलकर्णी, तसेच सिव्हिल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या विविध शंका, तसेच प्रश्नांची डॉ. रैना यांनी उत्तरे दिली. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी आभार मानले. पूजा पवार यांनी सूत्रसंचालन केले.



Kiran Bedi
@thekiranbedi

Is there a national, state, district wise water policy? If we have, let these be made public thru adverts. V need to know.

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, ९ एप्रिल २०१६



मानद संपादकीय



डॉ. देवानंद शिंदे कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ-कोल्हापूर

# उच्चशिक्षणातील गुणवत्तेकडे...

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे देशातील उच्च शिक्षण संस्थांची (नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क-एन.आय.आर.एफ.) क्रमवारी जाहीर करण्यात आली. या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठ देशात २८ व्या, तर राज्यातील अकृषी विद्यापीठांत अग्रस्थानी आले. या सन्मानामुळे आमच्यावरील जबाबदारी वाढली आहे.

कोणत्याही खासगी संस्थेची नव्हे, तर थेट केंद्र सरकारची त्यावर मोहोर असल्याने या क्रमवारीचे महत्त्व मोठे आहे. आता जगाच्या पाठीवरील कोणत्याही व्यक्तीला, विद्यार्थ्याला अथवा शैक्षणिक संस्थेलाही भारतीय विद्यापीठांचे नेमके स्थान काय, याची माहिती यातून मिळणार आहे. शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या व्यासपीठावरही याद्वारे आपला अधिकृतपणे प्रवेश झाला आहे. या संदर्भात दोन गोष्टींची जाणीव ठेवावी लागेल. भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी भारताला महासत्ता होण्याचे स्वप्न दाखविले. भारत जगातील सर्वाधिक तरुणांचा आणि म्हणूनच सर्वाधिक कृतिशीलतेचा, सर्जनशीलतेचा देश बनला पाहिजे. याच्या सिद्धीसाठी केंद्र सरकारने 'मेक इन इंडिया', 'स्कील इंडिया' ही अभियाने हाती घेतली आहेत. या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण संस्थांवर मोठी जबाबदारी येऊन ठेपली आहे. एकीकडे राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रूसा) अंतर्गत उच्च शिक्षणाच्या प्रवाहात येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण १५ ते १७ टक्क्यांवरून किमान २५ टक्क्यांच्या घरात नेण्याचे, त्याचबरोबर या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्याचे दुहेरी आव्हान उच्च शिक्षण संस्थांसमोर आहे. तथापि, गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांची निर्मिती हे आपल्या उच्च शिक्षण संस्थांसमोरचे सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संशोधन व विकास, कौशल्य शिक्षण, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या चतुःसूत्रीचाच आधार आपल्याला घ्यावा लागणार आहे. नवोपक्रम आणि समाजोपयोगी नवसंशोधनाला चालना देणे आणि त्यासाठी आवश्यक साधनसुविधांची निर्मिती करण्यासाठी विद्यापीठांनी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. केवळ पारंपरिक शिक्षणाच्या आधारावर उभ्या राहिलेल्या कच्च्या मनुष्यबळाचा भक्कम राष्ट्रबांधणीला किंवा त्याच्या व्यक्तिगत आयुष्यातही फारसा लाभ होऊ शकत नाही. त्यामुळे कौशल्यविकास हा आजच्या काळातील शिक्षणातील कळीचा मुद्दा बनला आहे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित शिक्षण घेऊन बाहेर पडणारे मनुष्यबळ राष्ट्रासाठी चांगले योगदान देऊ शकते.

तंत्रज्ञान हाही आजच्या शिक्षण व्यवस्थेचा पासवर्ड आहे. अत्याधुनिक माहिती संवाद तंत्रज्ञानाच्या अंगिकाराने या व्यवस्थेत एक मूलभूत बदल आणला आहे. विद्यार्थ्यांना चहूबाजूंनी माहितीची कवाडे खुली आहेत. तथापि, या माहितीचे प्रोसेसिंग करून त्याचे ज्ञानात रूपांतर करून देणाऱ्या शिक्षकांची खरी गरज आहे. त्यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था हवी. उपलब्ध मनुष्यबळाचे, तसेच अतिरिक्त मनुष्यबळाचेही योग्य व्यवस्थापन करण्याचे ज्ञानही या व्यवस्थेत आवश्यक बनले आहे. या चारही बाबींचे जितके संतुलन व समन्वयन आपण साध्य करू, तितकी आपली उच्चशिक्षण व्यवस्था अधिक विद्यार्थीभिमुख व समाजाभिमुख होईल. विद्यापीठांच्या संदर्भातील आणखी एक बाब प्रकर्षाने बदलण्याची आवश्यकता जाणवते. ती म्हणजे संशोधनाची व्याप्ती ही केवळ विद्यापीठांपुरती मर्यादित राखता कामा नये, तर तिचा विस्तार पदवीपूर्व स्तरापर्यंतही केला पाहिजे.

महाविद्यालयीन जीवनापासून संशोधनाची गोडी निर्माण करण्याची गरज आहे; जेणेकरून समाजाभिमुख संशोधनाची व्याप्ती खऱ्या अर्थाने वाढेल. त्यासाठी महाविद्यालयीन शिक्षकांनाही संशोधनासाठी विद्यापीठांनी प्रेरित करायला हवे. महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्यार्थी या दोन्ही घटकांना संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी एखादी प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती किंवा पारितोषिक योजना विद्यापीठे स्वनिधीतून राबवू शकतात. इतरही अभिनव योजना, प्रकल्पांचा विचार करता येऊ शकतो. राष्ट्रउभारणी करणाऱ्या युवकांचे हात संशोधन, तंत्रज्ञान व कौशल्यांनी परिपूर्ण असतील आणि त्याला विवेकाची जोड असेल, तर त्या राष्ट्राचे महासत्तेत रूपांतर होण्यास वेळ लागणार नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

9 APR 2016

# डॉ. पतंगेंच्या तंत्रज्ञानावर उमटली 'पेटंट'ची मोहोर

## तुपापासून कमी स्निग्धांशाच्या स्प्रेडनिर्मितीबाबत संशोधन


सकाळ वृत्तसेवा



डॉ. पतंगे

कोल्हापूर, ता. ८ : येथील कृषी महाविद्यालयातील डॉ. ज्ञानेश्वर देवराव पतंगे यांनी संशोधित केलेल्या तंत्रज्ञानाला भारत सरकारकडून बौद्धिक संपदेचा हक्क (पेटंट) मिळाला आहे. त्यांचे संशोधन तुपापासून कमी स्निग्धांशाच्या स्प्रेडची निर्मिती या विषयाशी संबंधित आहे.

डॉ. पतंगे यांनी संशोधनातून तुपाचा वापर करून कमी स्निग्धांशाच्या स्प्रेडची म्हणजेच लोण्यासारख्या पदार्थाची निर्मिती केली आहे. सामान्यतः लोण्याचा वापर ब्रेड, चपाती, पराठा व इतर खाद्यपदार्थांवर स्प्रेड म्हणजेच पसरवून खाण्यासाठी होत असतो. लोण्यात ८० टक्के स्निग्धांश, प्रथिने, कर्बोदके उपलब्ध असतात; पण आहारतज्ज्ञांच्या मते मानवी ऊर्जेची गरज स्निग्धांशापेक्षा प्रथिने व



कर्बोदकेमार्फत पेणे आवश्यक असते, तथापि लोण्यासारख्या पदार्थातून ही गरज पूर्ण होत नाही. यासोबतच लोणी फ्रीजमध्ये साठवावे लागते. लोण्याचा वापर स्प्रेड म्हणून करत असताना त्यास फ्रीजच्या बाहेर काढल्यावर लगेच ब्रेड किंवा चपातीवर पसरवता येत नाही. लोणी बराच वेळ फ्रीजच्या बाहेर राहिल्यास त्यातून तूप बाहेर येण्याची शक्यता असते.

या सर्व बाबींचा विचार करून संशोधनात तूप वापरून कमी स्निग्धांशाचे स्प्रेड तयार केले आहे. या पदार्थात लोण्यापेक्षा स्निग्धांशाचे प्रमाण निम्म्याने कमी केले असून प्रथिने व कर्बोदकाचे प्रमाण प्रत्येकी ८ ते ९ टक्क्यांपर्यंत वाढविले आहे; शिवाय हा पदार्थ फ्रीजमधून बाहेर काढल्यास लगेच पसरविला जातो आणि बराच वेळ फ्रीजच्या बाहेर राहूनसुद्धा वितळत नाही.

डॉ. पतंगे यांनी राष्ट्रीय दुग्ध संशोधन संस्था (कर्नाल, हरियाना) येथील डॉ. अशोक पटेल, डॉ. गिरधारी पाटील, डॉ. रामसिंह व विद्यापीठाच्या दुग्धशास्त्र विभागाचे माजी प्रा. डॉ. ज्ञानेश्वर भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन केले आहे.

संशोधनाचा पेटंट क्रमांक २७१४१७ आहे. भविष्यात हे संशोधन एखाद्या इच्छुक उद्योजकाने खरेदी केल्यास त्यापासून विद्यापीठास आर्थिक लाभ मिळेल, अशी अपेक्षा महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या पशुसंवर्धन विभागाचे प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे यांनी व्यक्त केली. डॉ. पतंगे यांना संशोधनासाठी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजाराम देशमुख, माजी संशोधन संचालक डॉ. सुभाष म्हेत्रे, अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक यांचे प्रोत्साहन मिळाले.